मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशीत राजकीय घोडेबाजार!

## मैदानावरून राजकीय रस्सीखेच; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे फिल्डींग

**मनीषा थोरात-पिसाळ**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मोशी परिसरातील रिव्हर रेसिडेन्सी सोसायटीजवळी आरक्षण क्रमांक १/१३७ या ठिकाणी लहान मुलांच्या खेळाच्या मैदानाचे आरक्षण आहे. परंतु हे मैदान महापालिका प्रशासनाने घोडेस्वारीसाठी एका संस्थेला दिले आहे. त्यावरून परिसरातील राजकीय वातावरण तापले असून, यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापर्यंत अनेकांनी मैदानाबाबत फिल्डींग लावल्या आहेत. त्यामुळे हे मैदान खेळासाठी की घोडेस्वारीसाठी राहणार याबाबत नागरिकांसमोर प्रश्न उभा राहीला आहे. याबाबत परिसरातील राजकीय पदाधिकाऱ्यांनी परिसरातील नागरिकांच्या हितासाठी पुढाकार घेऊन हा प्रश्न कशा पध्दतीने सुटला जाईल यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.



“ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदन दिले आहे. तसेच आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत चर्चा करून तोडगा द्यावा अशी मागणी केली. तसेच नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आहे त्या ठिकाणी मैदान व्हावे अशी आमची मागणी आहे.

– प्रा.कविता आल्हाट, महिला शहराध्यक्षा राष्ट्रवादी

“ या परिसरात मोठ्या सोसायट्या असून, सुमारे पन्नास हजार नागरिक याठिकाणी राहतात. त्यांच्यासाठी खेळाचेमैदान आणि गार्डन व्हावे यासाठी माझी मागणी आहे. त्या ठिकाणी होणाऱ्या एसटीपीला विरोध करून दुसरीकडे पाठविला आहे. १/ १३० रिव्हर सोसायटीच्या मागे गट ९० मध्ये खेळाचे मैदान आणि गार्डन दोन हेक्टरमध्ये करावे अशी मागणी केली आहे.ज्यावेळी हॉर्स रायडींगची मागणी झाले, त्यापूर्वीच स्पोर्ट कॉम्प्लेक्सचे नियोजन तयार झाले होते.

–राहूल जाधव, माजी महापौर

“ हे मैदान कुठल्याही संस्थेला न देता नागरिकांसाठी खुले करावे. मुळात या जागेवर खेळासाठीचे आरक्षण आहे. त्यासाठी या जागेचा वापर नागरिकांना व्यायामासाठी, चिमुकल्यांना खेळण्यासाठी खेळाडूंना सरावासाठी होऊ द्यावा.

–रूपाली आल्हाट, उपशहर संघटिका पिंपरी-चिंचवड शिवसेना

“ आरक्षण क्रमांक १/१३७ या ठिकाणचे मैदान हे घोडेस्वारीसाठी दिले असून, त्याचा फायदा परिसरातील नागरिकांना, मुलांना होणार आहे. त्यापासून जवळ असलेले मैदान आपण खेळासाठी आणि उद्यानासाठी विकसित करून देण्यास तयार आहोत. मोशी परिसरात खेळाचे मैदान नसल्यामुळे मुलांना मैदानी खेळापासून मुकावे लागते आहे. त्यांच्यासाठी परिसरात चांगले मैदान व्हावे अशी प्रत्येक नागरिकांची इच्छा आहे. त्यामुळे हे मैदान घोडेस्वारीसाठी की खेळासाठी हा राजकीय पदाधिकाऱ्यांसाठी कळीचा मुद्दा ठरणार आहे.

–शेखर सिंह, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त

# पिंपरी-चिंचवड महापालिका अधिकाऱ्याला मारहाण!

## माजी नगरसेविकेच्या पतीसह तीन जणांवर गुन्हा दाखल

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

कर्मचाऱ्याने उद्धट वर्तन केल्याबाबत त्याला नोटीस दिली. याचा राग मनात धरून सहायक आरोग्य अधिकाऱ्याला मारहाण केली. याप्रकरणी माजी नगरसेविकेच्या पतीसह तिघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भोसरी येथील 'ई' क्षेत्रीय कार्यालयात मंगळवारी (दि.५) दुपारी ही घटना घडली. राजेश नंदलाल भाट (५४, रा. थेरगाव) यांनी याप्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार शंकर मुरलीधर सोनवणे (३२, रा. बोपखेल गावठाण), संतोष लांडगे (४५) यांच्यासह एका अनोळखी व्यक्तीविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला, संतोष



लांडगे हे भाजपच्या माजी नगरसेविका सारिका लांडगे यांचे पती आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजेश भाट हे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ई-क्षेत्रीय कार्यालयात सहायक आरोग्य अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांनी शंकर सोनवणे यास विनापरवाना गैरहजर आणि उद्धट वर्तनाबाबत नोटीस बजावली होती. त्याचा राग मनात धरून त्याने इतर साथीदारांना घेऊन येत राजेश भाट यांना शिवीगाळ केली.कर्मचाऱ्याने उद्धट वर्तन केल्याबाबत त्याला नोटीस दिली. याचा राग मनात धरून सहायक आरोग्य अधिकाऱ्याला मारहाण केली. याप्रकरणी माजी नगरसेविकेच्या पतीसह तिघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भोसरी येथील 'ई' क्षेत्रीय कार्यालयात मंगळवारी (दि.५) दुपारी ही घटना घडली.

# प्रदूषणमुक्त इंद्रायणीसाठी सरकारला आली जाग

## प्रदूषणमुक्त इंद्रायणीसाठी सुमारे ५१५ कोटी रुपये खर्च अपेक्षित

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सरकारपातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. उगमापासून संगमापर्यंतची गावे आणि औद्योगिक वसाहतींमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी २३ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचे नियोजन केले आहे. त्याची निविदाप्रक्रिया येत्या दोन महिन्यांत सुरू होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. इंद्रायणी नदीचे अस्तित्व म्हणजे 'ऑक्सिजनविरहित वाहणारे सांडपाणी' अशी झाली आहे. पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीसह मावळ आणि खेड तालुक्यातील औद्योगिक पट्ट्यातील कंपन्यांतील रसायनयुक्त आणि घरगुती मैलामिश्रित सांडपाणी गटारे, नाले, ओढ्यांद्वारे थेट नदीत मिसळत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचा चऱ्होलीतील एसटीपी सुरू आहे. त्यात घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात आहे; पण मुख्य औद्योगिक परिसर असलेल्या चिखली-कुदळवाडीतील एसटीपी अद्याप कार्यान्वित झालेला नाही. त्यामुळे घरगुतीसह औद्योगिक रसायनयुक्त सांडपाणी नाल्याद्वारे चिखली-मोई पुलाजवळ थेट नदीत मिसळत आहे. तसेच उगमापासून संगमापर्यंत असलेल्या गावांमध्ये व तळेगाव, चाकण, निघोजे, म्हाळुंगे, मरकळ, धानोरे, खराबवाडी, कुरुळी, चिंबळी आदी भागांतील कंपन्यांचे 'एसटीपी' नाहीत. त्यामुळे त्यांचे सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेसह पुणे क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), आळंदी व तळेगाव नगर परिषद, देहू नगरपंचायत व ग्रामपंचायतींचे प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवत वेळकाढूपणा करत आहे. नदीचे प्रदूषण मात्र वाढत आहे. त्यातील ऑक्सिजनचे प्रमाण शून्यावर गेले आहे. रासायनिक घटक वाढले आहेत. पाण्यावर काळसर तवंग व फेस अनेकदा बघायला मिळतो.



> “ 'पीएमआरडीए'ने इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांतर्गत ८२ किलोमीटर अंतरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी डीपीआर (विकास आराखडा अहवाल) तयार केला आहे. तो रिव्हर कन्झर्व्हेशन डायरेक्टरेट यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. यामध्ये पीएमआरडीए हद्दीत २३ ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सुमारे ५१५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. महापालिका व एमआयडीसीची आमचा समन्वय आहे. या संस्था त्यांच्या क्षेत्रात एसटीपीचे काम करणार आहेत.
>
> – **दीपक सिंगला,** अतिरिक्त आयुक्त, पीएमआरडीए

> “ शहरातील 'एमआयडीसी'तील उद्योगांचे रासायनिक व औद्योगिक सांडपाणी वेगळ्या भूमिगत वाहिन्यांद्वारे एकत्र करायचे. ते 'सीईटीपी'त आणून त्यावर प्रक्रिया करायची असे प्राथमिक नियोजन आहे. सुमारे तीन हजारांवर लघुउद्योग सीईटीपीला जोडण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये चाकण व तळेगाव एमआयडीसीचा भागही असेल. कोणती कंपनी कोणते रसायन वापरून सांडपाणी सोडते, याची माहिती संकलनाचे काम सुरू आहे. नंतर डीपीआर तयार केला जाईल.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, महापालिका

> “ उद्योगमंत्र्यांनी आढावा घेतला आहे. नदीच्या उगमापासून संगमापर्यंतचा औद्योगिक परिसर व गावांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 'एसटीपी' उभारण्यात येणार आहेत. त्याची निविदा प्रक्रिया दीड-दोन महिन्यांत सुरु होईल. साधारण दीड वर्षात सर्व एसटीपी कार्यान्वित करण्याचे उद्योगमंत्र्यांनी संबंधित यंत्रणेला सांगितले आहे. मी वैयक्तिक त्यासाठी पाठपुरावा करत आहे.
>
> – **श्रीरंग बारणे,** खासदार, मावळ लोकसभा मतदारसंघ

# महामानवाला अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटला

## फुलांच्या पाकळ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची रांगोळी अभिवादन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भीमसृष्टी पिंपरी येथे फुलांच्या रांगोळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र रेखाटत, शेकडोंच्या संख्येने रक्तदान करून, शेकडो मेणबत्ती प्रज्वलन करत महामानवाला अनोखे अभिवादन करण्यात आले, तसेच विविध सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी आणि आंबेडकर अनुयायांच्या वतीने डॉ.



बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरीत भीमसृष्टी येथे विविध फुलांच्या पाकळ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रांगोळी काढून चित्र रेखाटण्यात आले होते. तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने मोठ्या संख्येने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शेकडोंच्या संख्येने तरुणांनी रक्तदान केले. आंबेडकरी अनुयायांच्या वतीने भीमसृष्टी येथे हजारो मेणबत्त्या प्रज्वलित करण्यात आल्या होत्या. दरम्यान, विविध सामाजिक संस्थांनी अन्नदान रण्यात केले. सायंकाळी प्रा. डॉ . संजय मोहड यांच्या सुरेल गीतांनी संगीतमय अभिवादन करण्यात आले. एच ए येथील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला देखील हार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच शहरातील विविध भागात बुद्ध विहारात डॉ आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. ६ डिसेंबर १९५६ साली दिल्ली येथे भारतीय राज्यघटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.

# विद्यार्थ्यांची पायपीट थांबणार!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मोफत बस सेवा सुरू

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, नागरिकांसाठी मोफत बससेवा पूर्ववत करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य प्रवेशद्वार ते विद्यापीठातील विविध ठिकाणी बसने जाणे शक्य झाले असून, येत्या काळात बससेवेसाठी स्वतंत्र उपयोजन ( ॲप्लिकेशन) विकसित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे. विद्यापीठाला दोन बस दत्तक मिळाल्या होत्या. त्यानंतर विद्यापीठ परिसरासाठी बससेवा सुरू करण्यात आली होती. मात्र काही कारणाने ती सुरू राहू शकली नाही. विद्यापीठाचा आवार मोठा असल्याने स्वतःचे वाहन नसलेले विद्यार्थी, नागरिकांना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने पुन्हा एकदा बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून विविध ठिकाणी सहज पोहचणे शक्य झाले




आहे. सकाळी साडेदहा वाजल्यापासून मुख्य प्रवेशद्वारापासून मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे. विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, की बससेवेसाठी ठिकठिकाणी थांबे करण्यात आले आहेत. सध्या किती विद्यार्थी, नागरिकांकडून या बससेवेचा वापर केला जातो याचा आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार येत्या काळात या बससेवेसाठी उपयोजनाची निर्मिती करण्यात येणार आहे. या उपयोजनावर बस किती वेळात थांब्यावर पोहोचेल याची माहिती मिळेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परिसरात ये-जा करण्यासाठी विद्यापीठाच्यावतीने मोफत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. सकाळी १०:३० वाजतापासून सुरू होणारी ही सेवा विद्यापीठ परिसरातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी विद्यार्थी आणि नागरिकांना पोहचण्यात मदत करणार आहे. यामुळे विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाचा परिसरात मोठा असल्याने स्वतःचे वाहन नसलेल्या विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक आणि नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवेसाठी विद्यापीठातर्फे दोन बसेसे देण्यात आल्या आहेत. मुख्य प्रवेशद्वारापासून ही सेवा उपलब्ध असून विद्यापीठाच्या सर्व प्रमुख विभाग आणि कार्यालयासमोर जवळपास १३ बस थांबे सुरू करण्यात आले आहे. भविष्यात विद्यार्थी आणि नागरिकांचा प्रतिसाद बघता थांब्यांच्या संख्येत वाढ करण्यात येणार आहे. तसेच ठिकठिकाणी यासंदर्भात फलकही लावण्यात येणार आहेत. याशिवाय येत्या काळात बससेवेसाठी स्वतंत्र उपयोजन (ॲप्लिकेशन) विकसित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे. या सेवेमुळे विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक आणि नागरिकांना निश्चित मदत होणार आहे. हा प्रवास अधिक सुलभ व्हावा यासाठी विद्यापीठातर्फे ॲप तयार केले जाणार आहे. ज्यामुळे बस नेमकी कुठे आहे, किती वेळात कोणत्या थांब्यावर पोहचेल यांची माहिती वापरकर्त्यांना मिळेल, असं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी यांनी सांगितलं. विद्यापीठात आल्यावर विद्यार्थी, नागरिकांना आधी खुप पायपीट करावी लागायची. मात्र प्रशासनाने दोन सीएनजी बसेसे पुरवून ही सेवा सुरू केल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे.

### बसचे थांबे कोणते असतील?

**» या इको-फ्रेंडली सेवेचा जास्तीत जास्त लोकांना उपभोग घेता येईल यासाठी भविष्यात यात आणखी चांगले बदल करण्यात येईल, असं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी सांगितलं आहे. विद्यापीठाचा मुख्य प्रवेशद्वार, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र (जयकर ग्रंथालय), रसायनशास्त्र विभाग, परिक्षा विभाग, आंतरराष्ट्रीय केंद्र, मुख्य इमारत, तंत्रज्ञान विभाग, मुलींचे वसतीगृह, आरोग्य केंद्र, पुंबा, मुलांचे वसतीगृह, मुख्य प्रवेशद्वार. सकाळी १०:३० पासून दर अर्ध्या तासाला ही बस चालणार आहे.**

# जेजुरी नगरपालिकेचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष!

## कर्मचार्यांनी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून रोजच्या रोज माहिती द्यावी : जगताप

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महिन्यापूर्वी जेजुरी नगरपालिका सभागृहात आमदार संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत आमदार जगताप यांनी नगरपालिका प्रशासनाला आरोग्य व स्वच्छतेविषयक सूचना केल्या होत्या. मात्र, त्या सूचनांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करीत नागरिक त्रस्त झाल्याचे माजी नगरसेवक हेमंत सोनवणे यांनी सांगितले. जेजुरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत सोनवणे बोलत होते. माजी नगरसेवक अजिंक्य देशमुख, सचिन सोनवणे, महेश दरेकर, रुक्मिणी जगताप उपस्थित होते. सोनवणे म्हणाले की, दि. ६ नोव्हेंबर रोजी जेजुरी नगरपालिका सभागृहात आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील स्वच्छता,



कचर्याचे व्यवस्थापन, नागरिक व भाविकांचे साथीच्या रोगांपासून संरक्षण व्हावे म्हणून धुरळणी, जंतुनाशक फवारणी, कचरागाड्यांची दुरुस्ती, याकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले होते. त्यावर आमदार जगताप यांनी नगरपालिका प्रशासनाने स्वच्छता, कचर्याचे नियोजन, धुरळणी, फवारणी, घंटागाड्यांची दुरुस्ती करून दररोज नागरिकांना सुविधा द्यावी, याबाबत अधिकारी व कर्मचार्यांनी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून रोजच्या रोज माहिती द्यावी, अशा सूचना केल्या. मात्र, या सूचनांकडे संबंधित अधिकारी व कर्मचार्यांनी दुर्लक्ष केले आहे. सध्या शहरात सर्वत्र कचर्याचे ढीग साचले असून, त्यातून दुर्गंधी येत आहे. सार्वजनिक शौचालये स्वच्छ केली जात नाहीत. घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्रात कचर्याचे विलगीकरण केले जात नाही. संबंधित ठेकेदारास प्रशासन का पाठीशी घालत आहे? यापूर्वी नगरपालिकेत काँग्रेसची सत्ता होती. या काळात बारीक-सारीक गोष्टीस विरोधक टीका करीत होते. सध्या दोन वर्षे प्रशासकीय राजवट असून, पाण्यासह स्वच्छता आदी अनेक प्रश्न असून, याकडे विरोधक गप्प का? असे सवाल विचारून सध्या विरोधक नको त्या गोष्टींत हस्तक्षेप करून चमकोगिरी करीत असल्याचा आरोपही सोनवणे यांनी केला.

# बिबटप्रवण तालुक्यात दिवसा थ्री फेज वीजपुरवठा करण्याचे निर्देश द्या

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची भुपेंद्र यादव यांच्याकडे मागणी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आंबेगाव, खेड, जुन्नर आणि शिरूर तालुक्यांतील बिबट्यांची वाढती संख्या आणि हल्ले रोखण्यासाठी बिबट प्रजनन नियंत्रण करावे, तसेच या चारही तालुक्यांत दिवसा थ्री फेज वीजपुरवठा करण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीय वने व पर्यावरणमंत्री भुपेंद्र यादव यांच्याकडे केली. या वेळी यासंदर्भात तातडीने बैठक बोलाविण्याचे निर्देश यादव यांनी वन विभागाचे महासंचालक चंद्र प्रकाश गोयल यांना दिले. शिरूर लोकसभा मतदारसंघातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांत बिबट्यांच्या संख्येत कमालीची वाढ झाली असून, मानवी वस्त्यांत बिबट्यांकडून होणारे हल्ले वाढले आहेत. या हल्ल्यात अनेक लहान मुलांसह शेतकऱ्यांचे मृत्यू होत आहेत. त्यामुळे बिबट प्रजनन नियंत्रण करण्याची गरज आहे, अशी भूमिका खासदार डॉ. कोल्हे सातत्याने मांडत आहेत. याच मागणीच्या



अनुषंगाने त्यांनी बुधवारी (दि. ६) केंद्रीय वने व पर्यावरणमंत्री भुपेंद्र यादव यांची भेट घेतली. त्यानंतर केंद्रीय मंत्री यादव यांच्या सूचनेवरून वन विभागाचे महासंचालक गोयल यांचीही भेट घेतली. त्यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रीय मंत्री यादव आणि महासंचालक गोयल यांनी तातडीने बैठक बोलाविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. बिबट्यांच्या हल्ल्याइतकाच घोणसच्या सर्पदंशाचा विषयही गंभीर झाला आहे. सर्पदंश झालेल्या व्यक्तींना वेळेत उपचार न मिळाल्यास दगावण्याचा धोका असतो. सर्पदंशावरील उपचारांसाठी मोठा खर्च येतो. त्यामुळे अशा रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार व्हावेत तसेच बिबट्यांच्या हल्ल्यात जखमी अथवा बळी पडलेल्या व्यक्तींना आर्थिक मदत केली जाते, त्याच धर्तीवर सर्पदंशाने मृत्यू अथवा कायमचे अपंगत्व आलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केंद्रीय मंत्री यादव आणि महासंचालक गोयल यांच्याकडे केली. या मागणीची तातडीने दखल घेत केंद्रीय मंत्री यादव आणि महासंचालक गोयल यांनी स्नेक बाईट सेंटर सुरू करता येईल का? किंवा घोणस सर्पदंशाचे प्रमाण कमी करता येईल का? याची चाचपणी करण्याचे निर्देशही दिले.

# महिला पोलीस उपनिरीक्षकासह दोघे बडतर्फ

## ललित पाटील प्रकरणात आतापर्यंत चारजणांची हकालपट्टी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** अमली पदार्त तस्कर ललित पाटील ससून रूग्णालयातून पसार झाल्याप्रकरणी कर्तव्यात हलगर्जी केल्याच्या ठपका ठेवून महिला पोलीस उपनिरीक्षकासह दोघांना पोलीस दलातून बडतर्फ करण्याचे आदेश बुधवारी देण्यात आले. ललित पाटील प्रकरणात आतापर्यंत पुणे पोलीस दलातील चार पोलिसांना बडतर्फ करण्यात आले आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक आणि सहाय्यक फौजदाराला सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. पोलीस उपनिरीक्षक मोहिनी डोंगरे, सहाय्यक फौजदार जनार्दन काळे अशी बडतर्फ केलेल्यांची नावे आहेत. २९ सप्टेंबर रोजी ससून रूग्णालयाच्या परिसरात मेफेड्रोन बाळगल्याप्रकरणी दोघांना गुन्हे शाखेने अटक केली होती. त्यांच्याकडून दोन कोटी १४ लाख रुपयांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले होते. ससून रूग्णालयातील कैदी उपचार कक्षात (वॉर्ड क्रमांक १६) उपचार घेणारा अमली पदार्थ तस्कर ललित पाटील मेफेड्रोन विक्रीत सामील असल्याचे उघडकीस आले होते. याप्रकरणी ललितसह तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर २



ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास ललित वॉर्ड क्रमांक १६ मधून बंदोबस्तास असलेल्या पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाला होता. त्यानंतर वॉर्ड क्रमांक १६ मध्ये बंदोबस्तास असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. बंदोबस्तात हलगर्जी केल्याचा ठपका ठेवून दहा पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. ललितला पसार होण्यास मदत केल्याप्रकरणी पोलीस नाईक नाथाराम भारत काळे आणि पोलिस शिपाई अमित सुरेश जाधव यांना अटक करण्यात आली होती. अटक केल्यानंतर दोघांना पोलीस दलातून बडतर्फ करण्याचे आदेश देण्यात आले. कर्तव्यात हलगर्जी केल्याचा ठपका ठेवून पोलीस उपनिरीक्षक मोहिनी डोंगरे आणि जनार्दन काळे यांना निलंबित करण्यात आले होते. चौकशीत दोषी आढळल्यानंतर डोंगरे आणि काळे यांना पोलीस दलातून बडतर्फ करण्याचे आदेश बुधवारी देण्यात आले. पाटीलला पसार होण्यास मदत केल्याप्रकरणी दोन पोलिसांना अटक करण्यात आली, तसेच कारागृह रक्षक मोईस शेखला अटक करण्यात आली आहे.

### पोलिसांना गुंगारा देऊन पसार

**» याप्रकरणी ललितसह तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. ललित पाटील मेफेड्रोन विक्रीत सामील असल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास ललित वॉर्ड क्रमांक १६ मधून बंदोबस्तास असलेल्या पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाला होता. त्यानंतर वॉर्ड क्रमांक १६ मध्ये बंदोबस्तास असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. यानंतर वॉर्ड क्रमांक १६ मध्ये बंदोबस्तास असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. बंदोबस्तात हलगर्जी केल्याचा ठपका ठेवून दहा पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.**